PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Formative Written Test I (2024-25)

## Standard - VIII

**Subject - Marathi** | **Marks - 20**
**Date - 9.8.2024** | **Time - 9.30 a.m. to. 10.45 a.m.**

### विभाग – १ गद्य (९ गुण)

**प्र. १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

वैशाख महिन्यातलं ऊन करपवून टाकणारं असायचं. आम्ही गावातली सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडायचो. अंगात गारवा भरला, की पुन्हा काठावर येऊन बसायचं. काठालगत खूप खडक होते. पाण्याच्या प्रवाहामुळे गुळगुळीत, सपाट झालेले, लांबरूंद पसरलेले. आम्हांला तिथच आमचा 'कॅनव्हास' सापडला. या भल्या थोरल्या खडकावर मनसोक्त चित्रं काढता येणार होती; पण कशानं काढणार ? तोही मार्ग सापडला. आमच्या त्या भागात तांबूस रंगाचा मुरूम असतो. शिवाय पिवळट रंगाचे दगडही सापडतात. ते दगड आपटले, की त्याची पिवळी पिवळी फक्की पडते. अगदी पिठासारखी असते. हवं तसं पाणी घातलं, की पिवळा रंग तयार ! मुरुमाचा खडा ओला करून घेतला आणि खडकावर चित्र रेखाटणं सुरू झालं. काय काढू आणि काय नको असं व्हायचं. गुडघ्यावर टेकून रेष काढण्यात दंग व्हायचो. रेषा काढीत हातभर पुढं सरकल्यावर मागे वळून पहावं, तर रेषा वाळून लालजर्द झालेल्या असायच्या. आणखी सुरसुरी यायची. तापलेल्या खडकावर टेकून टेकून गुडघ्याची सालटं गेलेली लक्षातच यायची नाहीत. मग उभ्या खडकावर चित्र काढणं सुरु झालं. काही दिवसांनी वाटायला लागलं, की यात रंग भरावेत; पण ते कुठून आणणार ? त्या दिवसांत काटेसावर फुलते, लालभडक होते. तिच्या फुलातले पराग पाण्यात चुरगाळले, की जांभळा रंग मिळतो. शेंदरी नावाच्या वनस्पतीच्या बोंडातल्या बिया भगवा रंग देतात. काही पानांचा हिरवा केला. चुन्याचा पांढरा, कुंकवाचा लाल आणि दगडाचा पिवळा होताच. बांबूची कोवळी काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा. तहानभूक हरपून आम्ही दगडावरची चित्र रंगवत बसायचो. नजर जाईल तिथपर्यंत चित्रंच चित्र. थोड्या दिवसांनी पाऊस यायचा. नदी वाहायला लागायची. आमची चित्र नदीच्या पोटात गडप व्हायची.

**१) आकृतीबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** (१)

नदीच्या काठालगत असलेल्या खडकाची वैशिष्ट्ये

[ ] [ ]

**२) योग्य जोड्या जुळवा.** (२)

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १) | पिवळा | झाडांच्या पानापासून |
| २) | जांभळा | दगडांपासून |
| ३) | भगवा | काटेसावरीच्या फुलातील परागकणांपासून |
| ४) | हिरवा | शेंदरी झाडाच्या बियांपासून |

**३) खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा.** **(१)**

१) उताऱ्यात आलेल्या मराठी महिन्याचे नाव - [ ]

२) बांबूच्या कोवळ्या काडीपासून तयार व्हायचा - [ ]

**४) खालील शब्दांसाठी उताऱ्यात आलेले समानार्थी शब्द शोधा.** **(१)**

१) रस्ता - [ ]

२) खेडे - [ ]

**प्र. १ (ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

सर्वजण : मेंदूराजेसाहेबांचा जयजयकार असो !

मेंदूराजे : बसा मंडळी पोटोबा प्रधान आले, की नाही अजून !

पोटोबा : मी केव्हाच हजर आहे महाराज.

मेंदूराजे : पोटोबा, या सर्व मंडळींची तुमच्याबद्दल तक्रार आहे, की तुम्ही अजिबात काम करत नाही. नुसतं खाता आणि दुसऱ्यांवर गुरगुरता.

पोटोबा : महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय, कसूर माफ असावी; पण मी काम करत नाही हे म्हणणं साफ खोटे आहे. हो, अधूनमधून मी गुरगुरतो; पण ते यांच्यावर नव्हे, ती माझी सवय आहे. त्याशिवाय शरीराचं राज्य सुरळीत कसं चालणार? आता हेच उदाहरण घ्या ना. या सर्वांनी संप पुकारला. मी गप्प बसलो; पण याचा परिणाम त्यांनाच भोगावा लागला. जीवनरस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेलेत.

मेंदूराजे : नयनकुमार, पटलं ना सर्वांना ! शिवाय असं पहा, आपण सारेच एकमेकांवर अवलंबून आहोत. आपल्या देशाचं राज्य सुरळीत कसं चालणार? आपल्या देशाचं राज्य चालतं ते सर्वांच्या एकतेमुळे. पाय चालतात ते रस्ता डोळ्यांनी दिसतो म्हणून. सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे. आपणाला जीवनरस मिळतो म्हणून. त्याने अन्न खाल्ले नाही तर काय हाल होतात ते आता तुम्हाला समजले असेलच. आपण सारेच या शरीररुपी राज्याचे सेवक आहोत. आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक व्हायलाच हवे. खरे ना?

सर्वजण : होय महाराज, पोटोबा आम्हांला क्षमा करा. आता पुन्हा नाही आम्ही तुमच्याविषयी कुरकुर करणार. आपण सारेच या राज्याचे सेवक. आपण सारे एक! आपण सारे एक!

**१) आकृतीबंध पूर्ण करा.** **(१)**

सर्वांनी पोटोबांबद्दल केलेली तक्रार

[ ] [ ]

**२) खालील शब्दांसाठी उताऱ्यात आलेले विरुद्धार्थी शब्द शोधा.** **(१)**

अ) असुरक्षित X आ) खोटे X

**३) स्वमत :** 'आपण सगळे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा. **(२)**

## विभाग - २ पद्य (५ गुण)

**प्र.२ खालील कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**कविता : प्रभात**

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

भव्य पटांगण, बाग मनोहर,
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर,

गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्त्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची.

विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने, नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.

मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

**कवी – किशोर बळी**

**१) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(१)**

कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रूजतील?

**२) दिलेल्या शब्दाचा आधार घेऊन चौकटी पूर्ण करा.** **(२)**

अ) अमूल्य शिकवण - (कोणाची) - [ ]

आ) पायाभरणी - (कशाची) - [ ]

इ) पसरणारा सुवास - (कशाचा) - [ ]

ई) सुंदर जग - (कोणाचे) - [ ]

**३) कवितेच्या आधारे योग्य पर्याय निवडा.** **(२)**

१) कवीच्या मते मानवतेचे युग म्हणजे

अ) मानवांचे युग    ब) नव्या विचारांचे युग

क) माणसाच्या प्रगतीचे युग    ड) भेदाभेद नसलेले युग

२) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली कारण

अ) सूर्योदय होऊन सकाळ झाली

ब) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरु झाला.

क) नवे युग उजाडले.

ड) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

## विभाग - ३ व्याकरण व भाषाभ्यास (६ गुण)

**प्र. ३ अ) खालील शब्दांची वर्णरचना लिहा. (कोणतेही १)** **(१)**

१) विचार -

२) दुथडी -

**प्र. ३ ब) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून लिहा. (कोणतेही २)** **(२)**

१) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

२) तुम्ही सकाळी कधी उठता ?

३) माझे घर शाळेजवळ आहे.

४) शाब्बास! चांगले काम केलेस.

**प्र. ३ क) खालील विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्य तयार करा.** **(१)**

आम्हाला खूप वाटायचं की आपण चित्र काढावीत; पण काय करणार

**प्र. ३ ड) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(२)**

१) आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही !

२) पोटोबामुळे आपलीही फरफट होते.

३) माझं प्राथमिक शिक्षण एका लहानश्या खेड्यात झालं.

४) विचार करता करता लक्षात आलं, की गाईचे शेण ओलं असताना जस असतं तसंच ते वाळल्यावरही राहतं.

❖❖❖